1600 मालिका कॉल्सबाबत महत्त्वाची माहिती

मला 1600 ने सुरू होणाऱ्या क्रमांक मालिकेतून कॉल आल्यास त्याचा अर्थ काय आहे?

1600 ने सुरू होणारी क्रमांक मालिका नियमनाधीन वित्तीय संस्थांकडून सेवा-संबंधित आणि व्यवहार-संबंधित कॉल करण्यासाठी वापरली जाते. यामुळे ग्राहकांना वित्तीय संस्थांकडून येणारे अधिकृत कॉल ओळखण्यास मदत होते.

अधिकृत कॉल कसा ओळखावा?

1. येणारा कॉल 1600 ने सुरू होतो का ते तपासा. जर होय, तर तो आपल्या अधिकृत वित्तीय सेवा प्रदात्याकडून आलेला सेवा-संबंधित कॉल आहे.
2. शंका असल्यास, वित्तीय संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा ग्राहक सेवा क्रमांकावर संपर्क साधून कॉल करणाऱ्याची ओळख पडताळून घ्या.

डीएनडी आणि यूसीसी संरक्षण

अवांछित व्यावसायिक संदेश येणे कसे टाळता येईल?

येणारे सर्व व्यावसायिक संदेशवहन (कॉल आणि एसएमएस) ग्राहक ब्लॉक करू शकतात किंवा सात विशिष्ट श्रेणींमधील अवांछित व्यावसायिक संदेश निवडकपणे ब्लॉक करू शकतात:

3. बँकिंग / विमा / वित्तीय उत्पादने / क्रेडिट कार्ड्स
4. स्थावर मालमत्ता
5. शिक्षण
6. आरोग्य
7. ग्राहकोपयोगी वस्तू आणि वाहने
8. संपर्क / प्रसारण / मनोरंजन / माहिती तंत्रज्ञान
9. पर्यटन आणि मनोरंजन. राष्ट्रीय ग्राहक पसंती नोंदणी' (एनसीपीआर) - ज्याला 'डीएनडी रजिस्ट्री' म्हणूनही ओळखले जाते - यामध्ये आपली पसंती नोंदवून हे करता येते.

एनसीपीआरमध्ये नोंदणी करण्याची प्रक्रिया काय आहे?

डीएनडी नोंदणी:

अवांछित व्यावसायिक संदेश/कॉलमुळे होणारा त्रास टाळण्यासाठी, ग्राहक टेलिकॉम सेवा पुरवठादाराचे ॲप/वेबसाइट, ट्रायचे डीएनडी ॲप किंवा '1909' वर कॉल/एसएमएस करून सर्व व्यावसायिक संदेश/कॉल ब्लॉक करू शकतात किंवा आपल्या पसंतीच्या श्रेणींनुसार त्यांची निवडकपणे ब्लॉक करण्याची सुविधा वापरू शकतात.

तक्रार करण्याची प्रक्रिया काय आहे?

तक्रारींची नोंदणी:

1. डिएनडीवर नोंदणी करूनही तुम्हाला स्पॅम (अवांछित संदेश) मिळाल्यास: तुमच्या संबंधित टेलिकॉम सेवा पुरवठादाराचे ॲप/वेबसाइट किंवा ट्राय डिएनडी ॲपद्वारे डीएनडी तक्रार नोंदवा, अथवा '1909' वर कॉल किंवा एसएमएस करा.
2. जर तुम्हाला संशयास्पद फसवणुकीचा संदेश किंवा संपर्क करण्याचा प्रयत्न झाल्यास: गेल्या 30 दिवसांत प्राप्त झालेल्या कोणत्याही संशयास्पद फसवणुकीच्या संदेशाबाबत किंवा संवादाबाबत, दूरसंचार विभागाच्या 'चक्षु' या प्लॅटफॉर्मवर https://sancharsaathi.gov.in/sfc/ येथे अहवाल द्या.
3. जर फसवणूक किंवा सायबर गुन्हा आधीच घडला असेल तर: जर तुमची आर्थिक फसवणुक झालेली असल्यास किंवा तुम्ही सायबर गुन्ह्याचे बळी ठरला असाल, तर या घटनेची तक्रार सायबर क्राईम हेल्पलाइन क्रमांक '1930' वर किंवा https://www.cybercrime.gov.in या वेबसाइटवर करा.